कागदी हस्तकलेच्या दुनियेत

मधुकर पालकर

'छात्र प्रबोधन' मधील
निवडक
कृतीपर लेखांचा
संग्रह

बालमित्रांनो, निर्मितीचा आनंद काही वेगळाच असतो. माझ्या इतक्या वर्षांच्या या कलाकृतींसोबतच्या प्रवासात मला तो भरपूर मिळाला. हा आनंद हीच या पुस्तकाच्या निर्मितीमागची मुख्य प्रेरणा आहे.

या पुस्तकाचा मूळ उद्देश हा आहे की मुलांनी लहानपणापासून इतर अभ्यासासोबत एका कलेचा छंद जोपासावा, ज्याचा पुढे त्याला व्यवसाय म्हणूनही उपयोग होईल. या छंदातून निर्मिलेल्या कृती भेट म्हणून देणे, यातला आनंद वेगळाच असतो. त्यातून या कृती टाकाऊ वस्तूंपासून असल्या तर हा आनंद आणखीनच द्विगुणित होतो. या कल्पना पुढे नेण्यासाठी टाकाऊतून टिकाऊ किंवा कचऱ्यातून कलानिर्मितीवर मी भर दिला. त्याचाच प्रयत्न पुस्तकातही आहे.

सजावट व सुशोभन, कागदकाम व कोलाज आणि संकीर्ण (इतर कृती रचना) या तीन भागात या पुस्तकाची सहज-सुलभ मांडणी केली आहे.

कला निर्मितीतला हा आनंद घेण्यासाठी सर्व वयोगटातील विद्यार्थी व मोठ्यांनीही हे पुस्तक जरूर वाचावे आणि कृती करून बघाव्यात.

छात्र प्रबोधन प्रकाशन
₹ ५०/-

कागदी हस्तकलेच्या दुनियेत

* लेखक *
मधुकर पालकर

छात्र प्रबोधन
ज्ञान प्रबोधिनी
५१०, सदाशिव पेठ, पुणे – 411 030
www.chhatraprabodhan.org

कागदी हस्तकलेच्या दुनियेत
('छात्र प्रबोधन' मधील निवडक कृतिपर लेखांचा संग्रह)

❖ छात्र प्रबोधन रौप्य महोत्सवी अक्षरभेट

❖ **प्रकाशक व मुद्रक**
प्रा. महेन्द्र सेठिया
संपादक, 'छात्र प्रबोधन',
ज्ञान प्रबोधिनी, पुणे 411030 ☎ (020) 24207 174/175
email - chhatraprabodhan@jnanaprabodhini.org

❖ **अक्षरजुळणी**
छात्र प्रबोधन,
ज्ञान प्रबोधिनी, पुणे

❖ **मुद्रित शोधन**
डॉ. रंजना दाते

❖ **लेखक व मुखपृष्ठ प्रकाशचित्र**
मधुकर पालकर
१०२१, सदाशिव पेठ, पालकर चेंबर्स, नागनाथ पाराजवळ,
पुणे 411030 ☎ (020) 24471766

❖ **अंतर्गत सजावट**
रोहित कोकिळ

❖ **प्रथम आवृत्ती :** राष्ट्रीय सौर पौष, शके १९३८, जानेवारी २०१७

© स्वामित्व प्रकाशकाच्या स्वाधीन

❖ किंमत
₹ ५०/-

'Kagdi Hastkalechya Duniyet'
(Collection of Art & Craft Paper Models)
(छात्र प्रबोधन मासिकात २००१ ते २०१२ या कालावधीत प्रसिद्ध झालेले निवडक कृतिपर लेख या पुस्तकात पुनर्मुद्रित केले आहेत.)

मनोगत

ज्ञान हे समुद्रासारखे अथांग आहे व ते कधीही न संपणारे आहे. शालेय जीवनात मुले शोधक वृत्तीची असतात. वाढदिवसाला मिळालेले खेळणे तो काही दिवस खेळतो; पण खेळण्यापेक्षा ते मोडल्यानंतर आतील रचना, फिरणारी चक्र, स्प्रिंग व किल्ली याचे सहाय्याने होणारी हालचाल-आकार व रचना पाहूनच त्याचे कुतूहल जास्त प्रभावित होते आणि तो वेगळ्या प्रकारची प्रतिकृती करण्याचा प्रयत्न करतो. अशा प्रयत्नांना वडिलधाऱ्या मंडळींकडून प्रोत्साहन मिळाल्यानंतर कौशल्य निर्माण होते व अशा कलाकौशल्याचा संगम झाल्यावरच कलाकाराचा जन्म होतो.

मलाही लहानपणापासून चित्रकला व हस्तकला या विषयांची आवड होती. माझे आजोबा उत्तम हस्तकौशल्य करीत होते. मी त्या कुतूहलाने अभ्यासत होतो. पुढे शालेय जीवनात गुरुजनांचे उत्तम मार्गदर्शन व सर्व कुटुंबियांचे प्रोत्साहन मिळाल्यामुळे मी बँकेमधून सेवानिवृत्त झाल्यावर गेले २०-२५ वर्षे पुण्यामधील प्रसिद्ध ज्ञान प्रबोधिनी व विद्याज्योती या शाळांमध्ये ओरिगामी व कोलाज या कला प्राथमिक स्वरूपात शिकवण्यास जात होतो. यातील विद्याज्योती ही शाळा गतीमंद मुलांची आहे व या शाळेतील काही मुलांची या छंदामध्ये प्रगती झाल्याचे बघितल्यानंतर माझ्या मनाला फार आनंद झाला. तसेच ज्ञान प्रबोधिनीमधील एक तप शिकवण्यापेक्षा-शिकण्यातच गेले कारण कुमारांसाठी कृतिशीलता जोपासणारे मासिक म्हणजे 'छात्र प्रबोधन'. त्यातील निरनिराळ्या उपक्रमांचे लेख व मान्यवरांचे मार्गदर्शन वाचनात आले. पुढे मा. संपादक श्री. महेन्द्रभाई सेठिया व या विभागातील कर्मचारी वृंदाची ओळख झाली व माझ्या काही कलाकृती मासिकामधून येण्यास सुरुवात झाली. आज हे पुस्तक त्याचेच फलित ! त्यामुळे मा. महेन्द्रभाई आणि सगळ्या छात्र प्रबोधन परिवाराचे मी सुरुवातीलाच मनापासून आभार मानतो!

माझ्याप्रमाणेच इतर कलाकारांनी केलेल्या त्यांच्या कृती छात्र प्रबोधन मासिकात आलेल्या होत्या. त्या कृती मी प्रत्यक्षात करून बघितल्या आहेत. प्रत्येक कलेमध्ये प्राविण्य मिळवलेल्या कलाकारांची उत्तमोत्तम पुस्तके आपल्या पाहण्यात असतात. तसेच काही वर्तमानपत्रात व मासिकांमध्ये मुलांसाठी विशेष सदर असते. या सर्वांचा या ठिकाणी नामनिर्देश करणे सहज शक्य होणार नाही; पण बाजारातून तयार वस्तू विकत घेण्यापेक्षा मुलांनी या साहित्याचा वापर करून स्वनिर्मितीचा आनंद घेतला तर अधिक चांगले.

नित्योपयोगी पुष्कळ गोष्टी आपण विकत आणतो व कालांतराने त्या फेकून देतो. परंतु या गोष्टींमधूनसुद्धा पुष्कळ कलाकृती निर्माण होतात याची ओळख होते. आईच्या किंवा आजीच्या जुन्या पातळाची गोधडी होते व ती फार मऊ व उबदार असते. हे एकच उदाहरण पुरे आहे. हल्ली ही गोधडी पण परदेशात जाते. तेव्हा पुठ्ठे, रंगीत कागद, औषधाचे खोके,

प्लॅस्टिक बाटली, प्राणी, पक्षी यांची चित्रे, कापडाचे तुकडे असे अनेक प्रकार आहेत की ज्यामधून लहान मुलांसाठी बोधपर भित्तीपत्रके तयार करता येतात व ती दुर्गम भागातल्या शिशुमित्रांना भेट म्हणून देता येतात.

या पुस्तकाचा मूळ उद्देश हा आहे की मुलांनी लहानपणापासून इतर अभ्यासासोबत एका कलेचा छंद जोपासावा की ज्यामधून पुढे त्याला व्यवसाय व अर्थार्जन करता येईल. साधी गोष्ट घ्या की, हल्ली शाळेमधून मुलांचे वाढदिवस साजरे करण्याची पद्धत आहे. यामध्ये भेटवस्तू आणणे व देणे हा प्रकार वाढलेला आहे. सामान्य कुटुंबातील माणसाला इतक्या भेटवस्तू विकत आणणे व वाटणे सहज शक्य नाही. यामुळे मुलांनी स्वत: केलेल्या कृती भेट म्हणून दिल्या तर हा आनंद वेगळा असतो व टाकाऊतून टिकाऊ वस्तू आपण बनवू शकतो. म्हणून घरी सर्व कचरा गोळा करायचा हा उद्देश नाही पण वेचक गोष्टींवर लक्ष देऊन त्यामधून कला-कौशल्याची वाढ व्हावी. हे प्रबोधन प्रदूषण टाळण्यासाठी व पर्यावरण जपण्यासाठी आहे. आपण गणपतीची घडी घालून मूर्ती केली तर बाप्पा नक्की रागवणार नाही, हे लक्षात ठेवा.

याच कल्पना पुढे नेता याव्यात म्हणून टाकाऊतून टिकाऊ किंवा कचऱ्यातून कला निर्माण करण्यावर लक्ष दिले. या पुस्तकाची मांडणी तीन भागात केलेली आहे. ते म्हणजे १. 'सजावट व सुशोभन' २. 'कागदकाम व कोलाज' व ३. 'संकीर्ण' (इतर कृती रचना). प्रत्येक विभागाच्या सुरुवातीस थोडक्यात माहिती दिलेली आहे व त्या भागातील कृती पण वर्गवारी केलेल्या आहेत. मग करा सुरुवात प्रत्येक विभागातील छोट्या छोट्या कृतीपासून आणि मिळवा आनंद. आपल्या संस्कृतीप्रमाणे चैत्र महिन्यातील वर्षप्रतिपदेची गुढी उभारण्यापासून फाल्गुन महिन्यातील होळी सणापर्यंत आणि गणपती-गौरी-दिवाळी-दसरा, दिवाळीतील किल्ला आणि असे पुष्कळ काही या पुस्तकाच्या माध्यमातून तुम्हाला करायला मिळेल.

बालमित्रांनो, निर्मितीचा आनंद काही वेगळाच असतो; माझ्या इतक्या वर्षांच्या या कलाकृतींसोबतच्या प्रवासात मला तो भरपूर मिळाला. हा आनंद हीच या पुस्तकाच्या निर्मितीमागची मुख्य प्रेरणा आहे ! या कलेत प्रावीण्य मिळवून त्यातून अर्थार्जन करावे, व्यवसाय सुरू करावा हा या कलेचा पुढचा टप्पा किंवा दुसरा भाग असे मी म्हणेन. त्यामुळे कला निर्मितीच्या या अथांग समुद्रात मुशाफिरी करण्यासाठी, कल्पनांच्या विश्वात स्वैर विहार करण्यासाठी माझ्या तुम्हाला मनापासून शुभेच्छा ! काही विचारावंसं वाटलं, सांगावंसं वाटलं, नवीन सुचलं तर मी कधीही उपलब्ध आहेच; नव्या कल्पना जरूर कळवा !!

– मधुकर पालकर

बँकेत असताना आजोबांची १६ गावांना बदली झाली. या प्रत्येक गावात देखील कृती-कौशल्याच्या कार्यशाळा त्यांनी घेतल्या.

त्यांनी बालकल्याण केंद्रात १५० शिक्षकांसाठी कार्यशाळा देखील घेतली आहे. हैद्राबाद-मध्ये लग्नसमारंभात ताटाभोवती वेगवेगळ्या प्रकारच्या रांगोळ्या काढण्याचं काम त्यांनी हौसेनं केलं.

लता मंगेशकर यांना ६० वर्षे पूर्ण झाली, त्या निमित्ताने पुण्याच्या बालगंधर्व कला दालनात निरनिराळ्या माध्यमातून लता मंगेशकर या विषयावर त्यांनी प्रदर्शन भरवले होते. कर्नाटक हायस्कूलमध्ये त्यांची ४० चित्रे (कोलाज) मांडण्यात आली होती. ठाणे येथील बेडेकर हायस्कूलमध्ये निरनिराळ्या खेळांची चित्ररचना मांडली होती. ते खूप कमी वेळा स्वस्थ बसायचे. सतत काही करत राहणेच त्यांना आवडते.

दर दिवाळीत माझे आजोबा किल्ल्यातील विविध चित्रे मला आनंदाने बनवून द्यायचे. मी त्यांच्याकडे आकाशकंदील बनवणे, गणपती बनवणे, ओरिगामी बनवणं शिकलो. आम्ही तीन नातवंडे आहोत. प्रत्येकजण आजोबांकडून विविध गोष्टी शिकायचो. त्यांनी केलेल्या गोष्टी जेव्हा ते समोरच्या व्यक्तीला देतात तेव्हा त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद व गतीमंद मुलांना शिकवून मिळणारं समाधान, हे त्यांच्यासाठी अतुलनीय आहे. आजोबांना माझी आजी 'काय कचरा गोळा करता?' असं ओरडायची; पण ओरड्यापेक्षा केलेल्या कलाकृतीचे कौतुक अधिक करायची. मित्रमंडळीदेखील आपुलकीने 'टाकाऊ वस्तू', उपयुक्त वस्तू आणून द्यायचे. मित्रमंडळी तसेच आम्हां सर्व घरच्यांच्या कौतुकामुळे, पाठिंब्यामुळे आजोबांना कायम ऊर्जा मिळते.

टी.व्ही., संगणक, मोबाईल अशा प्रलोभनांमध्ये वाहत न जाता वेळेचा योग्य तो वापर ते कायम करतात. कमीतकमी रेडीमेड वस्तूंचा वापर करून जास्तीत जास्त कल्पक गोष्टी बनवण्याची त्यांना आवड आहे. माझ्या आजोबांनी चालू केलेला हा उपक्रम सर्वांच्याच मनाला भावतो. आजोबांच्या सुंदर कलाकृतींच्या या पुस्तकाला आणि आजोबांनाही माझ्या खूप खूप शुभेच्छा ! मी आजोबांकडून आजही नवनवीन कलाकृती शिकत आहे. तुम्हीपण शिकायला येणार ना?

धन्यवाद !

– मानस अजित साठे

अनुक्रमणिका

सजावट व सुशोभन

१. 'श्री' गजाननासाठी मखर ९
२. श्री गजाननाची प्रतिकृती १२
३. समईच्या शुभ्रकळ्या १४
४. भिरभिरणारं सुशोभन १६
५. भिंतीवरील सुशोभन १७
६. भित्ती सुशोभन १९
७. आगळावेगळा आकाशकंदील २१
८. जपानी बाहुली २४
९. ता थै तकथा २६
१०. कागदाची फुलदाणी २८

कागदकाम व कोलाज

११. जादूचे पंखे ३१
१२. मनीपर्स किंवा मिनीपर्स ३४
१३. घडीचा सुबक पेनस्टँड ३५
१४. आकर्षक वेळापत्रक ३८
१५. कागदातून मोराची आकर्षक सौंदर्यकृती ४१
१६. कागदी पिशव्या शिकूया ४३
१७. पेन-पेन्सिल ठेवण्याचा स्टँड ४५
१८. आकर्षक पाकिटे घरच्या घरी ४७
१९. आकर्षक शुभेच्छापत्र ४९
२०. भेट पाकिट ५०
२१. वाढदिवसाची आकर्षक भेट ५१
२२. कागदाची पक्षी रचना ५३
२३. कोलाज शिल्प ५५
२४. कोलाज चित्रकारी ५८

संकीर्ण

२५. आंब्याच्या कोयीचा कायापालट ६२
२६. झोका खेळणारी माकडे ६४
२७. अभ्यासिकेतील दिवा ६६
२८. झोक्यावर झुलताना ६८
२९. झुक झुक चाले आगीनगाडी ७०
३०. स्ट्रॉ किंवा कागदाची नळी ७२